दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com


# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक २१५ वा रविवार दि.२८ जानेवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## लातूरच्या जिल्हा प्रशासनात व्ही जी एन टी चा वरचष्मा ; जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, तहसीलदार व्ही जी एन टी च !

### दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांच्या विचाराची पेरणी






लातूर :- समाजकारण असो की राजकारण सत्ता कारण अथवा प्रशासन असो ते यशस्वी साध्य करण्यासाठी योग्य ते सहकार्य आणि सहभागाची गरज असते गेल्या काही वर्षापासून सत्ताकारणात राज्य पातळीवर तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख आणि सुशील कुमार शिंदे यांची मिली भगत होती तर मराठवाड्यातील सर्वांगीण विकास आणि प्रशासकीय यंत्रणे संदर्भात विलासराव देशमुख आणि गोपीनाथराव मुंडे यांची मिली भगत होती हे सर्वश्रुत आहेच. लातूर बीड आणि औरंगाबाद येथील प्रशासकीय यंत्रणेत मुंडे देशमुख यांचीच मर्जी चालत होती विशेषता लातूरत विलासराव देशमुख आणि बीडमध्ये गोपीनाथराव मुंडे आणि संपूर्ण मराठवाड्यात मुंडे देशमुख यांची प्रशासकीय मर्जी चालत होती हे विशेष होते आज घडीला लातूर शहरात काँग्रेस भाजपाची राजकीय सत्ता असली तरी प्रशासकीय यंत्रणा मात्र दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांच्या कार्यकाळातील धोरणानुसारच लातूर शहरातील जिल्हाभरातील प्रशासकीय चित्र दिसते आहे. लातूरातील जिल्हा व शहर कार्यालयात काँग्रेसची प्रशासकीय यंत्रणा असायची, विलासराव नंतर काँग्रेस नेतृत्वाची पकड ढिली झाली आणि भाजपाची सरशी होत असतानाच ओबीसी समाजातील वंजारी अर्थात गोपीनाथराव मुंडे यांच्या कार्यकाळातील धोरणानुसार लातूर जिल्हा शहर कार्यालयात वंजारी समाजातील उच्चस्पद अधिकारी कार्यरत आहेत लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे आणि जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे तसेच लातूर तहसीलचे तहसीलदार सौदागर तांदळे हे वंजारी समाजाचे अधिकारी कार्यरत असल्याने काँग्रेसचे नेतृत्वाचे बळ कमी होत असल्याचे दिसते आहे. लातूर बीडचा प्रशासकीय यंत्रणेबाबत विचार करताना दिवंगत गोपीनाथराव मुंडे आमदार रमेश आप्पा कराड,खासदार प्रीतम ताई मुंडे आणि माजी मंत्री पंकजा मुंडे यांचाच प्रभाव असून लातूर आतील काँग्रेस भाजपा नेतृत्व कृती शून्य होताना दिसते आहे अशीच चर्चा होताना दिसते आहे.

## न्यायालयाच्या आदेशानुसार आंदोलकांवरील गुन्हे मागे

मुंबई : मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या १३ मागण्यांपैकी मराठा आंदोलकांवर आंतरवाली सराटीसह महाराष्ट्रातील सर्व गुन्हे मागे घेण्यात यावेत अशी प्रमुख मागणी करण्यात आली होती. यावर राज्य सरकारने अध्यादेशात गृह विभागाकडून याबाबत विहित प्रक्रिया अवलंबून गुन्हे मागे घेण्याचे निर्देश दिले आहेत, असे आश्वासन देण्यात आले होते.दरम्यान, गुन्हे माघारीवरून मंत्री छगन भुजबळ यांनी आक्षेप घेतल्यानंतर आता गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोणत्या प्रकारचे गुन्हे मागे घेतले जातील? याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी आज बोलताना सांगितले की गुन्हे मागे घेण्याचा आदेश देण्यात आला आहे त्यामध्ये आंदोलनाचे गुन्हे मागे घेतले जातील. मात्र, घरे जाळणे, थेट हल्ला करणे, एसटी जाळणे हे गुन्हे न्यायालयाच्या आदेशाशिवाय मागे घेता येणार नाहीत, असे स्पष्ट केले.दुसरीकडे मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर बोलताना ते म्हणाले की मला आनंद आहे, की मराठा आरक्षणावर सरकारने सकारात्मकता दाखवली आहे. मी मनोज जरांगे यांचं सुद्धा मी अभिनंदन करतो. या प्रश्नावर कायदेशीर मार्ग काढावा लागेल हे आम्ही आधीपासून म्हणत आहोत. यामुळे नोंदी असलेल्या रक्ताच्या नात्यातील लोकांना प्रमाणपत्र कसे देता येईल हा मार्ग स्वीकारला आहे, त्यामुळे मराठा समाजाचा प्रश्न सुटेल. हा निर्णय घेत असताना आम्ही ओबीसीवर अन्याय होऊ दिलेला नाही. राज्यातील सर्व समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले.

## ओबीसींना गाफील ठेवून मराठा आरक्षणाचा निर्णय, आम्ही गप्प बसणार नाही



नाशिक, ; मराठा आरक्षण अध्यादेश मसुद्याचे पत्र काढून मराठा समाजाचा विजय झाला असे म्हटले जात असले तरी मला काय तस वाटत नाही. झुंडशाहीने अशा प्रकारचे कायदे आणि नियम बदलता येत नाही. आम्ही सुद्धा शपथ घेताना कुठल्याही दबावाला बळी न पडता आम्ही निर्णय घेऊ अशी शपथ आम्ही सर्व मंत्रीमंडळानी घेतली आहे. मात्र ओबीसींना गाफील ठेऊन मराठा आरक्षणाबाबत निर्णय घेतला जात आहे. याचा सर्वांनाच विचार करावा लागेल असे सांगत (दि. १६) फेब्रुवारी पर्यंत ओबीसींसह सर्व समाज बांधवांनी या आरक्षणाच्या विषयावर आपल्या हरकती नोंदवाव्यात असे आवाहन मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत काढण्यात आलेल्या अध्यादेशानंतर आज नाशिक येथे मंत्री छगन भुजबळ यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मुंबई अध्यक्ष समीर भुजबळ हेही उपस्थित होते.

यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, झुंडशाहीच्या नावाखाली कुणीही कुठले कायदे नियम करू शकत नाही. आज घेण्यात आलेला हा निर्णय कायद्याच्या कसोटीत बसणारा नाही. आता शासनाने केवळ एक मसूदा प्रसारित केला असून याच नोटिफिकेशन मध्ये रुपांतर नंतर होणार आहे. शासनाने यासाठी १६ फेब्रुवारी २०२४ पर्यंत हरकती मागवल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील ओबीसी आणि इतर समाजाचे वकील, संघटना आणि नेत्यांनी याचा अभ्यास करून या हरकती पाठविण्याचे काम करावे असे आवाहन केले. तसेच अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने देखील लवकरच कायदेतज्ञांशी चर्चा करून हरकती नोंदविण्यात येतील अशी माहिती त्यांनी दिली. ते म्हणाले की, जात जन्माने येते ती कुणाच्या ॲफेडेव्हीटने मिळत नसते. त्यामुळे सगेसोयरे हे कुठल्याही परिस्थितीत कायद्याच्या कसोटीत टिकणार नाही. आज ओबीसी समाजात येऊन मराठा समाजाला आनंद झाला असेल पण त्याची दुसरी बाजू म्हणजे ८५ टक्के जाती ओबीसी मध्ये आल्या आहेत. तसेच ईडब्ल्यूएस मधील १० टक्के आरक्षण उरलेले इतर आरक्षण वगळता उरलेलं ५० टक्के आरक्षण मराठा समाजाने गमावले आहे. आता उर्वरित ५० टक्क्यात फारच थोड्या जाती शिल्लक राहिल्या आहेत. ती संधी मराठी समाजाने गमावली आहे. असे त्यांनी निदर्शनास आणून देत मराठा समाजातील नेत्यांनी आणि विचारवंतानी याचा विचार करायला हवा असेही ते म्हणाले.

## बाभळगाव येथील गोंड समाजातील नागरिकांना अनुसूचित जमाती (आदिवासी गोंड) प्रमाणपत्राचे वाटप




लातूर दि. २७ जानेवारी २०२४ गौड समाजाने हक्कासाठी संघर्ष केला. या संघर्षात सगळ्यांच्या सहकार्यातून त्यांना मदत झाली. आज यातून त्यांना हक्काचे घर, प्रमाणपत्र, हक्काचे गाव देण्यात आले आहे. या प्रमाणपत्रामुळे गौड समाजाचे विकासाचे महाद्वार खुले झाले आहे, तो आता विकासाच्या महामार्गावर चालेल याचा मला मनस्वी आनंद आहे. या समाजाने कधीच कोणाला कसलाही त्रास दिला नाही, असे सांगून त्यांनी सर्वांना भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या सर्वांना राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या. भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त बाभळगाव ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजीनगर अंतर्गत लातूर तालुक्यातील बाभळगाव येथील गोंड वस्तीतील अनुसूचित जमातीच्या बांधवांना अनुसूचित जमातीचे (आदिवासी गौड) प्रमाणपत्र वाटप शुक्रवार दि. २६ जानेवारी रोजी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते बाभळगाव येथील ग्रामसचिवालयात करण्यात आले. यावेळी लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, लातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तुकाराम भालके, नायब तहसीलदार सुधीर देशमुख, प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्रीपाद म्हेत्रे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोष देशमुख, बाभळगावच्या सरपंच प्रिया सचिन मस्के, उपसरपंच गोविंद देशमुख, दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगावचे सचिव शाम देशमुख, बाभळगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन महादेव जटाळ, मंडळ अधिकारी संजीव घाडगे, ग्रामसेवक अनंत मडके, तलाठी गोविंद तावरे, अविनाश देशमुख सचिन मस्के, सुधाकर जोशी, सादुराम मस्के, जीवनराव देशमुख, एन.आर.देशमुख, सुरेश देशमुख, गंगाधर जाधव, गणपतराव भाडूळे, अशोक चौधरी, बाभळगाव ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, आदिवासी गोंड समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी आमदार अमित देशमुख व मान्यवरांनी आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना विनम्र अभिवादन केले.माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, आदिवासी जननायकबिरसा मुंडा यांनी ज्या हक्कासाठी लढा उभा केला, या लढ्याला आज आपण न्याय देत आहोत. काही दशकापूर्वी हा गौड समाज भटकंती करत लातूर जिल्ह्यात आला याला निवारा देण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने ९० च्या दशकात घेतला.बाभळगाव ग्रामपंचायत ही लोकनेते विलासराव देशमुख यांच्या नावाने ओळखली जाते. या आदिवासी बांधवांचा स्वीकारही बाभळगाव ग्रामपंचायतीने केला असे ते म्हणाले. पुढे बोलताना ते म्हणाले की गोंड समाजाने अनेक संघर्ष केले, घरकुल मिळवण्यासाठीही त्यांनी संघर्ष केला. आमच्या सगळ्यांच्या सहकार्यातून त्यांना सहकार्य करण्यात आले. आज त्यांना हक्काचे घर, प्रमाणपत्र, हक्काचे गाव देण्यात आले. या प्रमाणपत्रामुळे गोंड समाजाचे विकासाचे महाद्वार खुले झाले आहे, तो आता विकासाच्या महामार्गावर चालेल याचा मला मनस्वी आनंद आहे. या समाजाने कधीच कोणाला कसलाही त्रास दिला नाही, असे सांगून त्यांनी सर्वांना भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी केले तर सूत्रसंचलन प्रा. जहांगीर पठाण यांनी केले तर शेवटी आभार सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्रीपाद म्हेत्रे यांनी मानले.

## मराठा समाजाला न्याय दिल्याबद्दल राज्यातील महायुती शासनाचे आ. कराड यांनी केले अभिनंदन



लातूर :- मराठा समाजाला आरक्षण मिळावे ही अनेक वर्षाची मागणी राज्यातील एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती शासनाने मान्य केली असून मराठा समाजाला न्याय देण्याची भूमिका घेतल्याबद्दल राज्यातील महायुती शासनाचे आभार व्यक्त करून या निर्णयाचा मराठा समाजातील गोरगरीब बांधवांना लाभ होईल असे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे व इतर सोयी सवलती मिळाव्यात याकरिता गेली अनेक वर्ष आंदोलन सुरू होते. मराठा समाजाच्या या न्याय हक्काच्या मागणीचा विचार करून मागील काळात तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी मराठा समाजाला आरक्षण दिले होते आणि न्यायालयात टिकवले होते असे सांगून भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, मात्र नंतरच्या काळात सत्ता बदलानंतर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाविकास आघाडी सरकारने उच्च न्यायालयात योग्य ती बाजू मांडली नसल्याने मराठा समाजाला दिलेले आरक्षण टिकवता आले नाही.

राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सत्ता आली आणि मराठा समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे मागणीसाठी पुन्हा एकदा महाराष्ट्रात मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात आंदोलन सुरू झाले. मराठा समाजाला आरक्षण देण्याची सुरुवातीपासूनच भूमिका असल्याने महायुती शासनाने शासन स्तरावर योग्य ते पाऊले उचलून राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब यांच्या नेतृत्वातील राज्य शासनाने मराठा समाजाला न्याय देण्याची भूमिका घेतली.

मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात मुंबई येथे आंदोलनासाठी जात असताना वाशी येथे सरकार आणि आंदोलक यांच्यात चर्चा होऊन योग्य ती तडजोड करण्यात आली आणि २७ जानेवारी रोजी सकाळी आयोजित जाहीर सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अध्यादेशाची प्रत मनोज जरांगे यांना सुपूर्त केली. यावेळी बोलताना त्यांनी मराठा समाजाला न्याय देण्याची भूमिका स्पष्ट करून मी छत्रपती शिवाजी महाराजांची घेतलेली शपथ पूर्ण करण्याचे काम करीत आहे असे बोलून दाखविले. यावेळी मनोज जरांगे यांनी एकनाथ शिंदे आणि महायुती शासनाचे जाहीर आभार मानले.

राज्यातील महायुतीचे शासनाने मराठा समाजाला न्याय दिला हक्क दिला या निर्णयामुळे मराठा समाजातील गोरगरीब, गरजूंना निश्चितपणे लाभ होईल. घेतलेल्या या धाडसी आणि ऐतिहासिक निर्णयाबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्यातील महायुती शासनाचे मनः पूर्वक जाहीर आभार मानले.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# मान, ममता, मर्यादा!

पंजाब, पश्चिम बंगाल आणि केरळमध्ये 'इंडिया' आघाडीने एकासएक उमेदवार देणे हे भाजपच्या पथ्यावर पडणारे ठरले असते; तसे होणे आता अशक्य पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या 'इंडिया' आघाडीशी स्थानिक काडीमोड करण्याच्या निर्णयामुळे भाजप अस्वस्थ झाला असणार. या दोन पक्षांनी आगामी लोकसभा निवडणुकांत स्वतंत्रपणे लढण्याचा इरादा जाहीर केला. ममताबाईंनी तर 'एकला चालो रे'चा नारा देत या निवडणुकीपुरता त्यांच्या तृणमूल काँग्रेसचा मूळ काँग्रेसशी काडीमोड झाल्याची घोषणाही केली. अलीकडे राजकीय विवाहापेक्षा घटस्फोट अधिक उत्साहात साजरे करण्याची नवी प्रथा रूढ झाल्याचे दिसते. त्यानुसार हा संभाव्य काडीमोड ममताबाईंनी आनंदाने जाहीर केला. त्यापाठोपाठ कोणीतरी सुरुवात करण्याची जणू वाट पाहात असल्यासारखे 'आम आदमी पक्षा'चे पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान हेदेखील अशीच विलगीकरणाची बांग देते झाले. त्या राज्यात 'आप'चे सरकार आहे आणि विधानसभा निवडणुकांप्रमाणे लोकसभेतही आपण चांगल्या संख्येने उमेदवार निवडून आणू असा त्या पक्षाला विश्वास आहे. 'इंडिया' आघाडीतील पक्षांत जागावाटप निर्णायक टप्प्यावर आले असल्याचे सांगितले गेले. काँग्रेसचे मल्लिकार्जुन खरगे, राष्ट्रवादीचे शरद पवार इत्यादी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सीताराम येचुरी आदी ज्येष्ठ मंडळी या जागावाटपाचे गुऱ्हाळ मोठ्या उत्साहाने आणि उमेदीने चालू ठेवताना दिसतात. त्या सगळ्यांनाच आशा आहे. अशा वेळी ममताबाई आणि भगवंतबाबा यांनी आपली स्वतंत्र चूल मांडण्याची घोषणा केली. ममताबाई आणि भगवंतबाबा 'इंडिया' आघाडीचे घटक म्हणून नव्हे तर स्वतंत्रपणे लोकसभा निवडणुका लढतील या वृत्तामुळे भाजप धुरिणांच्या कपाळावरील आठ्या निश्चितपणे वाढतील. ममता आणि मान यांच्या घोषणेने सत्ताधीशांच्या समाजमाध्यमी भक्तांत आनंद साजरा होऊ लागला असला तरी या त्यांच्या हंगामी घटस्फोटाचे दुष्परिणाम भाजप नेते जाणतात.याचे कारण पंजाब, पश्चिम बंगाल आणि केरळ या राज्यांत 'इंडिया' आघाडीत जागावाटपात एकमत होऊन एकास-एक उमेदवार दिले जावेत ही प्रत्यक्षात भाजपची इच्छा होती. या तीन राज्यांत अशी आघाडी होणे हे भाजपच्या पथ्यावर पडणारे आहे. पश्चिम बंगालमध्ये काँग्रेस आणि तृणमूल एकत्र आले तर ममताविरोधी मते भाजपच्या पदरात पडून त्यास फायदा होणार हे उघड आहे. वास्तविक याआधी ममतांची तृणमूल आणि काँग्रेस यांनी हातमिळवणी केली नव्हती असे अजिबात नाही. याआधी पश्चिम बंगाल विधानसभेच्या २००१ सालच्या निवडणुका या दोघांनी एकत्रितपणे लढल्या होत्या. नंतर २००९ सालच्या लोकसभा निवडणुकांतही हे दोन पक्ष एकत्र होते. तेव्हापासूनच या दोन पक्षांचा घरोबा आहे. त्यातूनच २०११ सालच्या विधानसभा निवडणुका या दोघांनी एकत्रपणे लढवून मार्क्सवादी पक्षाची ३४ वर्षांची राजवट संपुष्टात आणली हा इतिहास आहे. तेव्हापासून सत्ता तृणमूलच्या हाती आहे आणि मार्क्सवादी आणि काँग्रेस हे विरोधी पक्षांत आहेत. पुढे राष्ट्रीय स्तरावर काँग्रेस आणखी गाळात गेली आणि डाव्यांचे बळही आटत गेले. अलीकडेच झालेल्या विधानसभा निवडणुकांत त्यामुळे काँग्रेस आणि भाजपने सत्ताधारी तृणमूलच्या विरोधकांचे काम केले. यात आवर्जून लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे गेल्या म्हणजे २०२१ साली झालेल्या राज्य विधानसभा निवडणुकांत तृणमूलच्या विजयाचा आकार. या निवडणुकांत भाजपने तृणमूलसाठी मोठे आव्हान निर्माण केले होते आणि त्या पक्षाचा विजय जवळपास निश्चित मानला जात होता. तथापि या निवडणुकांत मार्क्सवादी पक्षाने जवळपास बघ्याची भूमिका घेतली आणि त्यातून ममताविरोधी मतांचे विभाजन यशस्वीपणे टाळले. त्याचा परिणाम असा की २९४ सदस्यांच्या विधानसभेत तृणमूलला २२३ जागी यश मिळाले आणि प्रचंड ताकदीने मैदानात उतरलेला भाजप फक्त ६८ जागांवर यश मिळवू शकला. त्या विधानसभा निवडणुकांत काँग्रेसचा धुव्वा उडाला. त्याच वेळी खरे तर त्या निवडणुकांतील डाव्यांच्या भूमिकेविषयी संशय व्यक्त केला गेला आणि त्यांनी ममतांसाठी ही निवडणूक 'सोडली' असे बोलले गेले. म्हणजे ममता आणि भाजप या दोन 'विरोधी' पक्षीयांपैकी ममतांहाती सत्ता देणे डाव्यांनी पसंत केले. तेच समीकरण आताच्याही निवडणुकीत विचारात घेतले जात असून ममताविरोधी मतांची विभागणी टाळणे हे डाव्यांचे उद्दिष्ट आहे. तेव्हा ममतांच्या स्वतंत्र बाण्यामागे हे राजकारण आहे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तोच विचार पंजाब आणि केरळ या राज्यांतही सुरू आहे. या दोन्ही राज्यांत भाजपचे स्थान नगण्यच. पंजाब खरे तर अकाली दलाचे राज्य. त्या पक्षाने धर्माच्या मुद्द्यावर भाजपशी हातमिळवणी केली आणि काळाच्या ओघात ही भाजपची मिठी त्या पक्षासाठी मगरमिठी ठरली. पुढे भाजपही त्या राज्यात गाळात गेला आणि अकाली दलाचेही भाजपशी फाटले. गेल्या निवडणुकांत भाजपने काँग्रेसच्या अमरिंदर सिंगांसारख्या वयोवृद्ध आणि थकल्या-भागल्या नेत्यास आपल्याकडे ओढून राज्यात आपले स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

# प्रजासत्ताक दिन आणि बुद्धी गहान ठेवलेला समाज ?.



जगात विज्ञानाने झपाटयाने प्रगती केली असली तरी भारत देशातील बहुसंख्य लोकना ते मान्य होत नाही.ते प्रजासत्ताक दिनी सत्यनारायणाची महापूजा घालणारच कारण त्याच्या बुद्धीला ते पटण्याचा आणि न पटण्याचा प्रश्नच त्यांच्या समोर उभा राहत नाही. त्यांनी धार्मिक पुस्तकांचे वाचन केले तर लक्षात आले पाहिजे की,अनेक देवांनी आईच्या उदरातून बिन बापाचा जन्म घेतला आहे आणि त्यांचे अनेक उदाहरणं वाचायला मिळतात. हा सर्व प्रकार वाचून डोक्यातला मेंदू गहान ठेवल्यासारख आम्हाला वाटत त्यांना का वाटत नाही ?. म्हणूनच त्यांना बुद्धी गहान ठेवलेला समाज का म्हणून नये. निसर्गाचा नियम आहे कि येथे नर आणि मादी एकत्र आल्याशिवाय नवीन उत्पती होत नाही. बीज लावल्या शिवाय त्याला अंकुर येत नाही ते बीज अंकुरायला देखील सुपीक जमीन लागते.योग्य वातावरण लागते..! साधे निरीक्षण,निसर्गात बदल होतो. वसंत ऋतूची चाहूल लागताच अगदी उघडी बोडकी झालेली डोंगरावरची झाडे व गवत फुलायला लागतात. वसंताचा स्पर्श होताच निसर्गातला रोमांच उत्तेजित होतो आणि झाडांवर कळ्या डोकवायला लागतात फुले येतात.

फुले आली कि पुन्हा त्यांच्यात फलधारणा होण्यासाठी फुलांतून परागीकरण व्हावे लागते अश्या खूप गोष्टी आहेत ज्या लक्ष्य वेधुन घेतात.आता देवांनी जर धर्म रक्षणासाठी समाजात जन्म घेतला असेल तो ही बिन बापाचा?. तर आपण हा विचार नक्कीच करायला हवा एका परमेश्वराचा गायीच्या गोठयात जन्म झालाय म्हणे, त्याची आई कुमारी माता, लोकांनी तिलाही देव मानला आणि त्या मुलालाही..! मग समाजात असी एखादी घटना घडली तर समाज ते का स्वीकारत नाही.अशा कथां सर्वच धर्मात मध्ये आढळतात, (बुद्ध धम्म सोडुन ) त्याला रामायण-महाभारत सुद्धा अपवाद नाही..! मग आज अनेक कुमारी माता मुलाना जन्म देतात त्या कुलटा का ठराव्यात.एका बाजूला ज्याना आम्ही पाहिले नाही अश्या बिन बापाच्या अपत्याला आम्ही देव मानायचे आणि दुसऱ्या बाजूला आज असे अपत्य जन्माला आहे कि त्या मुलाला आणि त्याच्या आईला समाजातून बहिस्कृत करायचे..!. मग त्यांना बुद्धी गहान ठेवलेला समाज का म्हणून नये.

लोकांच्या भावनाचा काही ताळमेळ नाही. वाचता-वाचता असे लक्षात येते कि,शूद्रांचा जन्म हा ब्रम्हदेवाच्या पायाच्या अंगठ्यातून झालाय.आता पायाला किंवा अंगठ्याला असा कोणताही भाग नाही कि तेथून एखादी मुंगी जन्मास येईल किवा बेंबीमधून कोणी जन्माला येईल च कसा?. मग हा काय प्रकार आहे. जीव जन्माला घालायचे हे कोणते अनाधिकृत मार्ग..!. आमच्या बुद्धीला पटत नाही म्हणून लिहतो. आम्हाला शिक्षणामुळे विचार करण्याची बुद्धी मिळाली म्हणूनच आम्ही बुद्धीचा वापर करून विज्ञानाच्या कसोटीवर तपासून पाहतो. ते केल्याने आज पर्यन्त आमचे नुकसान करण्याची एकाही देवाची देवीची हिंमत झाली नाही. म्हणूनच आणि बोलतो,लिहतो. म्हणूनच त्यांना बुद्धी गहान ठेवलेला समाज का म्हणून नये.

आंब्याची बी (कोय) देखील अंकुर घेत असताना तिच्या आकाराचे निरीक्षण करा आणि आणि या पृथ्वीवर जन्म घेणाऱ्या प्रत्येक जीवाचा अभ्यास करा आणि मग ठरवा की कीती देव बिन बापाचे आणि आईचे जन्माला आलेत.मग असे अनैसार्गिक पद्धतीने जन्म घेणारे देव कसे..?. कोणता ही ताळमेळ नसतांना,रूढी परंपरेच्या नावाखाली देवधर्माची भीती घालून,भारतातील असंख्य जन-समुदायाला पिढीजात दैवी-गुलाम बनवून विशिष्ट तीन टक्केवाला समाज काल्पनिक कथा रचून लोकांना मुर्ख बनविन्याचे काम पिढ्यान-पिढ्या करतो. आणि आजची स्वताला उच्च सुशिक्षित,साक्षर म्हणणारी २० व्या -२१ व्या शतकातील डॉक्टर,वकील,प्राध्यापक,इंजिनियर,पोलिस अधिकारी,यू पी एस सी स्पर्धा परीक्षा देणारे अधिकारी,आय पी एस,आय ए एस,पिढी त्याचे मोकाटपणे पालन करतात. याचेच आम्हाला खूप दुख होते. प्रजासत्ताक दिनी सत्यनारायण महाराजाची महापूजा घालणाऱ्यांना नागरिक बनून जगण्याचा अधिकार कोणी दिल?. त्यांना प्रजेला दिलेल्या मूलभूत अधिकार घेण्याचा अधिकार आहे काय ?. यांना कोणतीही लोकलज्ञा भीती का वाटत नाही. कारण प्रशासकीय यंत्रणेत खरोखर बुद्धी गहान ठेवलेले लोक आहेत, हे सिद्ध होते.म्हणूनच यांना बुद्धी गहान ठेवलेला समाज म्हणावे लागते.

२६ जानेवारी १९५० ला भारत देश प्रजासत्ताक झाला. त्यास ७४ वर्ष पूर्ण झाले आणि ७५ व्या वर्षात आपण पदार्पण करीत आहोत. तरी प्रजासत्ताक दिन म्हणजे काय?. हे माहिती नसणे मोठे दुर्दव म्हणावे लागते. प्रजासत्ताक दिनी देशातील नागरिकांना काय काय मिळाले. कशामुळे मिळाले. कोणामुळे मिळाले. यांची माहिती जेष्ठ नागरीकांनी तरुण पिढीला दिली पाहिजे. त्या एवजी ते सत्यनारायण महापूजा घालतात.त्यातून ही सत्य बाहेर येत नाही. एक बोट पाण्यात बुडलेली ते सत्यनारायण महापूजा घालून वर येते तर भारतासह जगातील हजारो मालवाहतूक करणारे जहाज पाण्यात बुढालेली जहाजे सत्यनारायण महापूजा घालून ते वर काढण्यासाठी का प्रयत्न होत नाहीत. त्यासाठी २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन व १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनचं का निवडल्या जातो.यामागचे षड्यंत्र उच्च सुशिक्षित लोकांना कधी समजेल?.म्हणूनच त्यांना बुद्धी गहान ठेवलेला समाज का म्हणून नये. कोणाच्या धार्मिक भावना दुखविण्याचा माझ्या उदेश नाही. सत्य,सत्यनारायण आणि प्रजासत्ताक दिन यातील वैचारिक फरक लक्षात घेऊन त्यावर गांभीर्याने चर्चा अपेक्षित आहे. वाचकानी निर्भीड निपक्षपाती प्रतिक्रिया व्यक्त कराव्यात हीच अपेक्षा करतो. विज्ञान जवळ करा अज्ञान दूर करा हीच मानसिकता तयार झाली पाहिजे.अन्यता बुद्धी ची गरज काय?.

---------------

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९,भांडुप,मुंबई.**

# भारताला संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये स्थायी सदस्यत्व मिळायला हवे.

भारताला संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये स्थायी सदस्यत्व मिळावे यासाठी अनेक वर्षांपासून भारताचे प्रयत्न सुरू आहे व यासाठी प्रतिकुल परिस्थिती सुध्दा आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये(यूएनएससी) भारताला स्थायी सदस्यत्व मिळावे अशी इच्छा ब्रिटन, फ्रान्स, रशिया,अमेरिका यांची सुध्दा आहे.परंतु भारताच्या स्थायी सदस्यत्वासाठी चीनचा कडाडून विरोध पुर्वीही होता आणि आजही आहे.भारत अनेक वर्षांपासून संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये स्थायी सदस्यत्व मिळवण्यासाठी प्रयत्न करीत आहे.पण स्थायी सदस्यत्व मिळण्याच्या भारताच्या प्रयत्नांना प्रामुख्याने चीनकडून विरोध झाला आहे, चीनने भारताचा संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये समावेश रोखण्यासाठी त्यांच्या व्हिटो अधिकाराचा वापर केला आहे.असे असतांनाही अमेरिका, फ्रान्स, रशिया व ब्रिटन या स्थायी सदस्यांनी भारताच्या उमेदवारीला पाठिंबा दर्शविला आहे.परंतु जोपर्यंत हे पाचही देश एकमताने भारताच्या स्थायी सदस्यत्वाला जाहीर पाठिंबा देत नाही तोपर्यंत भारताला स्थायी सदस्यत्व मिळने कठीण आहे.कारण चीन भारताचा कट्टर वैरी आहे. त्यामुळे भारत पुढे जावा व प्रगती व्हावी असे चीनला कदापि वाटत नाही.परंतू भारताला स्थायी सदस्यत्व मिळाले पाहिजे याकरिता चीनवर जागतिक दबाव येत असल्याचे दिसून येते.यासाठी टेस्लाचे सीईओ अब्जाधीश उद्योगपती एलन मस्क भारताला संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये स्थायी सदस्यत्व मिळावे यासाठी चीनला फटकारल्याचे समजते.कारण टेस्लाचे सीईओ अब्जाधीश उद्योगपती एलन मस्क यांनी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत स्थायी सदस्य म्हणून भारताला सहभागी करून न घेतल्याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे.त्यांनी हेही म्हटले आहे की संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये भारताला सहभागी न करून घेणे म्हणजे मूर्खपणा आहे.संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या राष्ट्राचे पुरेसे प्रतिनिधित्व नसल्याचे सांगत त्यामध्ये फेरबदल करण्याची मागणी मस्क यांनी केली. संयुक्त राष्ट्राच्या संस्थांमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे.परंतु समस्या अशी आहे की ज्यांच्याकडे सर्वात जास्त ताकद आहे ते ती समस्या सोडविण्यास तयार नाहीत.जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश भारत असुनही व सर्वच बाबतीत सक्षम असतांना सुरक्षा परिषदेत कायमस्वरूपी स्थान न मिळणे हा तर मूर्खपणा आहे,असे एलन मस्क यांनी एक्स (पूर्वीचे ट्विटर) वरील पोस्टमध्ये म्हटले आहे.१ जानेवारी २०२१ रोजी भारत संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा अस्थायी सदस्य झाला. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये ५ स्थायी सदस्य असतात. त्याचप्रमाणे १० अस्थायी सदस्य सुध्दा असतात या १० मध्ये भारताचा समावेश आहे.परंतु या १० अस्थायी सदस्यांचा कालावधी फक्त दोन वर्षांचा असतो. परंतु स्थायी (कायम) सदस्याप्रमाणे व्हेटोचे अधिकार अस्थायी सदस्य देशांना नसतात.भारत बऱ्याच वर्षांपासून संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या कायम स्वरुपी (स्थायी) सदस्याचा आग्रह करीत आहे.त्याचप्रमाणे जगातील अनेक देश स्थायी सदस्यांची संख्या वाढविण्याची मागणी करीत आहे.परंतु चीन नेहमीच यामध्ये अडंगा टाकतांना दिसतो. कारण स्थायी सदस्यांची संख्या वाढली तर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये स्थायी सदस्यत्वाचा पहिला अधिकार भारताचा राहिल आणि हे चीनला कदापि सहन होणार नाही.त्यामुळे चीन भारता विरूद्ध आपली घृणास्पद चाल नेहमीच खेळत असतो.परंतु जगातील वाढती अस्थिरता लक्षात घेता स्थायी सदस्यांची संख्या वाढविणे अत्यंत गरजेचे आहे.संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे काम आणखी पारदर्शी व्हावे यासाठी जी-४ देश ब्राझील, जर्मनी, भारत आणि जपान यांनी स्थायी सदस्यत्वासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेकडे आग्रही भूमिका मांडली आहे.संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स, रशिया आणि चीन हे सध्या पाच स्थायी सदस्य देश आहेत.या राष्ट्रांना ठरावांना व्हिटो करण्याच्या क्षमतेसह महत्त्वपूर्ण अधिकार आहेत.दोन वर्षांच्या कालावधीसाठी निवडून आलेल्या गैरस्थायी सदस्यांचा परिषदेच्या अजेंड्यात सहभाग असतो.पण त्यांच्या स्थायी सदस्यांसाठी असलेल्या व्हिटोचा अधिकार मिळत नाही.संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची स्थायी सदस्यांची पाच पेक्षा जास्त सदस्य नसावे अशी जर भुमिका चीनची असेल तर तीला संकुचित परिषद म्हणावी लागेल.त्यामुळे अमेरिका, फ्रान्स, रशिया व ब्रिटन यांनी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमधील स्थायी सदस्यांची संख्या वाढविण्यावर भर दिला पाहिजे.तेव्हाच जगात एक चांगला संदेश जाईल आणि जागतिक सुरक्षिततेच्या बाबतीत सविस्तर चर्चा करता येईल व ठोस निर्णय घेण्यास मार्ग मोकळा होईल.संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये भारताच्या स्थायी सदस्यत्वासाठी वाढता जागतिक पाठिंबा ही भारतासाठी प्रगतीची मोठी वाटचाल म्हणावी लागेल.

----------

**रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# डॉ. सविता भीमराव आंबेडकर

जन्म - २७ जानेवारी १९०९ (दादर)
स्मृती - २९ मे २००३ (मुंबई)

डॉ. सविता भीमराव आंबेडकर (माईसाहेब) यांचा जन्म २७ जानेवारी १९०९ रोजी झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर समाजातील वंचितांच्या हक्कासाठी लढा दिला. पण त्यांचे कौटुंबिक जीवनही फार त्रासदायक होते. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी रमाबाई आजारपण आणि शारीरिक वृद्धीमुळे मरण पावल्या. त्याआधी बाबासाहेबांनी त्यांची चार मुलेही गमावली होती. या आघातांनी ते पडले होते.

दरम्यानच्या काळामध्ये बाबासाहेबांची प्रकृती देखील खालावत चालली होती. अशातच डॉ. शारदा कबीर यांच्यासोबत बाबासाहेबांची ओळख झाली. आजारपणामुळे बाबासाहेबांना नेहमीच उपचाराकरिता त्यांच्याकडे यावे लागत होते. दरम्यान कालांतराने त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. आणि १५ एप्रिल १९४८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी रजिस्टर मॅरेज पद्धतीने मोजक्या लोकांच्या उपस्थितीत दोघांचा विवाह पार पडला आणि शारदा कबीर या सविता आंबेडकर झाल्या. पुढे समाज त्यांना माईसाहेब या नावाने ओळखू लागला.



घटना निर्मिती मध्ये माईसाहेबांचा वाटा मोलाचा आहे. बाबासाहेब हे सतत व्यस्त असत. त्यांना आपल्या तब्येतीकडे लक्ष देता येत नसे. परंतु माईसाहेब बाबासाहेबांची पूर्ण काळजी घेत असतं. जर माईसाहेबांनी बाबासाहेबांची योग्य रित्या काळजी घेतली नसती तर कदाचित रमाईच्या मृत्यूनंतरचं बाबासाहेबांनी आपल्या कार्यातून विराम घेतला असता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत रमाई नंतर पुढे अधिक जगविण्याचे श्रेय त्यांनी सविता आंबेडकर अर्थात माईसाहेब यांना दिले आहे. त्यामुळे रमाई सोबतच माईसाहेब यांचं देखील बाबासाहेबांच्या जीवन कार्यात महत्त्वपूर्ण योगदान आहे.

तरीदेखील बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर माईसाहेबाना अपमान आणि अवहेलनेला समोर जावं लागलं. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर पुढे १९७२ पर्यंत माई दिल्लीतील नेहरोली भागात एकाकी जीवन जगात होत्या. त्यानंतर दलित पॅन्थर च्या चळवळीने जोर धरला तसं राजा ढाले यांनी त्यांना मुंबईत आणलं.

दलित पँथरच्या कार्यकर्त्यांनी माईंचा सन्मान केला, त्यांना आदरानं वागवलं. शारिरीक आणि मानसिक दृष्ट्या माई प्रबळ होत्या. पुढे दलित पँथर तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या सदस्य व कार्यकर्त्यांच्या आग्रहाने माईसाहेब दलित चळवळीच्या मुख्य प्रवाहात येऊ लागल्या होत्या. 'रिडल्स इन हिंदूझम' च्या आंदोलनात त्यांनी महत्त्वाची भूमिका घेतली होती.

माईसाहेब या अतिशय हूशार व संवेदनशील होत्या. त्यांचं इंग्रजीवरही प्रभुत्व होतं. हे त्यांनी बाबासाहेबांच्या सहवासात कमवलं होत. माईंनी 'डॉ.आंबेडकरांच्या सहवासात' हे बाबासाहेबांवर आधारित चरित्रपर पुस्तक लिहिले होते. त्यामध्ये त्यांनी बाबासाहेबांच्या प्रति असलेली प्रेमानुभतीचं वर्णन केलेलं आहे. त्याशिवाय हिंदू कोड बिलाच्या मसुद्याकरिता आवश्यक टिपणं आणि पाली शब्दकोशाकरिताही केलेली मदत अशा अनेक बाबी त्यांनी त्यात नमूद केलेल्या आहे. रमाईच्या निधनानंतर माईसाहेबांनी बाबासाहेबांना तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलं आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारकार्यातील एक शेवटचा दुवा म्हणजे माईसाहेब आबेडकर. त्यांचं जीवनही अस्वस्थ आणि थक्क करणारे आहे. माईसाहेब यांच्यावर आजपर्यंत खूप कमी लिहिलं गेलं आहे.

संदर्भ :
१) डॉ.आंबेडकरांच्या सहवासात - डॉ. सविता भीमराव आंबेडकर
२) भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म

# लोकशाही अधिक सक्षम करणे या विचारांचा अंगीकार गरजेचा माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख बाभळगाव ग्रामपंचायत येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण

लातूर दि. २७ जानेवारी २०२४ भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाही या दिवशी देशात लागू झाली लोक स्वातंत्र्याचा हा उस्तव आहे. या माध्यमातून लोकशाही अधिक सक्षम करणे हा विचार अंगीकारणे गरजेचे आहे असे राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे. ७५ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त बाभळगाव ग्रामपंचायत कार्यालय येथे राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी ध्वजारोहण केले. प्रारंभी आमदार अमित देशमुख यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना विनम्र अभिवादन केले. यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोष देशमुख, बाभळगावच्या सरपंच प्रिया सचिन मस्के, उपसरपंच गोविंद देशमुख, दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगावचे सचिव शाम देशमुख, बाभळगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन महादेव जटाळ, व्यंकटराव देशमुख महाविद्यालय प्राचार्य दुष्यंत कटारे, दयानंद माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शंकर राठोड, मंडळ अधिकारी संजीव घाडगे, ग्रामसेवक अनंत मडके, तलाठी गोविंद तावरे, अविनाश देशमुख, सचिन मस्के, सुधाकर जोशी, सादुराम मस्के, जीवनराव देशमुख, एन.आर.देशमुख, सुरेश देशमुख, गंगाधर जाधव, गणपतराव भाडळे, अशोक चौधरी, बाभळगाव ग्रामपंचायतचे सर्व सदस्य काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी शिक्षक विद्यार्थी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, बाभळगाव हे अतिशय वैशिष्ट्यपूर्ण गुणांसाठी जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात व देशात आपल्या गावाने नावलौकिक मिळवला आहे याचे श्रेय प्रत्येक गावकऱ्याचे आहे. गावाच गावपण गावकरी निश्चित करतात आपले गाव ही आपली प्राथमिकता आहे. या गावात खूप काही करण्यासारखं आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाही या दिवशी देशात लागू झाली लोक स्वातंत्र्याचा हा उस्तव आहे. लोकशाही अधिक सक्षम करणे हा विचार अंगीकारणे गरजेचे आहे. वृक्षतोड करणार नाही, पिण्याच्या पाण्याचा काटकसरीने वापर करणार, कचरा इतरत्र टाकणार नाही, बंधुभाव सामाजिक सलोखा जोपासला पाहिजे असा आपण संकल्प करावा असे त्यांनी आवाहन केले. पुढे



बोलताना ते म्हणाले की, लहान मुले विद्यार्थी ही उद्याची पिढी आहेत ते सुशिक्षित निर्माण झाली पाहिजे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण

विकासाकडे लक्ष दिले पाहिजे, बाबळगाव ग्रामपंचायत व सोसायटीने गोरगरिबाला न्याय मिळवून दिला पाहिजे शेतकऱ्यांसाठीच्या योजना पारदर्शकपणे त्यांच्या दारापर्यंत पोहोचवल्या जाव्यात असे सांगून त्यांनी सर्वांना भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, लातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तुकाराम भालके, नायब तहसीलदार सुधीर देशमुख आदींसह संबंधित विभागाचे अधिकारी बाभळगाव ग्रामपंचायतचे पदाधिकारी उपस्थित होते.

## वनाझ परिवार विद्यामंदिर कोथरूड शाळेत ७५ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

पुणे: वनाझ परिवार विद्या मंदिर कोथरूड पुणे शुक्रवार दिनांक २६ जानेवारी रोजी शाळेत ७५ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा शृणाली आपटे यांची उपस्थिती लाभली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच वनाझ शिक्षण मंडळाच्या ,उपाध्यक्षा रजनीताई दाते, जनकल्याण संस्थेचे पदाधिकारी, वनाझ कामगार संघटनेचे पदाधिकारी इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात समूहगीताने करण्यात आली. प्रजासत्ताक दिनाचे सूत्रसंचालन माध्यमिक विभागाच्या शिक्षिका वृंदाताई घन यांनी केले व पाहुणे परिचय माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका वृषालीताई वाशिमकर यांनी केले.





त्याचबरोबर पालकांचा व विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग प्रजासत्ताक दिनी पाहायला मिळाला. या दिवशी बालवाडी ते माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी लाठी काठी नृत्य,मानवी मनोरे या खेळाचे प्रात्यक्षिक सादर केले. याच दिवशी मिशन सिटी चक्रया उपक्रमांतर्गत प्लास्टिक न वापरणे याबाबत शपथ घेतली गेली. प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी रोमांचकारी नृत्याचे सादरीकरण करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. व माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी मानवी मनोरे यांचे सादरीकरण केले. त्याचप्रमाणे शालेय गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करण्यात आले. व त्यांना सन्मान चिन्ह देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाचा शेवट शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अनिताताई दारवटकर यांनी आभार प्रदर्शनाने केला त्याचबरोबर विद्यार्थ्यांना खाऊ वाटपही करण्यात आला. सर्व विभागाच्या पर्यवेक्षिका शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने आजचा प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला.

## लातुरात माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते द बॅटल स्क्वेअर टर्फचा शुभारंभ

लातूर दि. २७ जानेवारी २०२४ क्रीडा क्षेत्रात करिअर घडवण्याच्या अनेक संधी आता निर्माण झाल्या आहेत, याचा प्रत्यय देत लातूर येथील सुमुख गोविंदपूरकर, हर्षद मुंडे आणि संस्कार मुंडे या तीन युवा मित्रांनी मिळून शहराच्या जुन्या एमआयडीसी परिसरात सुरू केलेल्या द बॅटल स्क्वेअर टर्फ या नावीन्यपूर्ण उपक्रमाचा राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी उपस्थित राहून शुभारंभ केला. द बॅटल स्क्वेअर टर्फ' स्थानिक खेळाडूंसाठी निश्चितपणे उपयुक्त ठरेल असा विश्वास यावेळी व्यक्त केला. क्रीडा क्षेत्रात आपले करिअर करणाऱ्या खेळाडू करीता उपयोगी ठरणाऱ्या द बॅटल स्क्वेअर टर्फची लातुर शहरातील कळंब रोड भागात सुरुवात करण्यात येत असून राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते शुक्रवार दि. २६ जानेवारी २०२४ रोजी शुभारंभ करण्यात आला. लातुर मधील युवकांना त्यांच्या वेळेनुसार खेळता यावे यासाठी हे टर्फ सुरू केले आहे. या ठिकाणी क्रिकेट सोबत टेनिस, व्हॉलीबॉल, फुटबॉल



खेळण्यासाठीची देखील व्यवस्था केली जाणार अशी संकल्पना असून या क्लबची क्रिकेट खेळापासून सुरुवात करण्यात आली आहे. ५२ बाय १०० आकाराचे द बॅटल स्क्वेअर टर्फ क्लब हे लातूर मधील सर्वांत मोठे एकमेव क्रिकेट सराव टर्फ आहे. यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी टर्फ मध्ये क्रिकेटचा आनंद घेतला. याप्रसंगी बोलताना राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले लातूर शहर सर्वच क्षेत्रात अत्यंत गतीने प्रगती करीत असून येथील युवावर्ग नवनव्या कल्पना प्रत्यक्षात सरकारून शहराच्या वैभवात भर टाकत आहेत, अशा होतकरू तरुणांच्या प्रयत्नांना सर्वतोपरी सहकार्य केले जाईल असे आश्वासनही दिले. आपल्या दैनंदिन जीवनात येणारा ताण तणाव कमीकरण्यासाठी आपल्या प्रत्येकाला खेळ खेळणे अत्यंत महत्त्वाचे आहे यासाठीअसे टर्फ व्हायला हवेत असे म्हणत या द बॅटल स्क्वेअर टर्फ क्लबला माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या.यावेळी बोलताना माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे म्हणाले की, लातुरमध्ये खेळाडू करिता असे स्टेडियम आहेत

# मराठी तितुका मेळावावा वाशी येथे विश्व मराठी संमेलन २०२४ प्रारंभ





नवी मुंबई / के. एच. हनवते :- (वाशी) नवी मुंबई येथे महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग, मराठी तितुका मेळवावा विश्र् मराठी साहित्य संमेलन २०२४ आज वाशी नवी मुंबई येथे सुरु करण्यात आले. या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती ऍड. प्रकाशजी आंबेडकर, राष्ट्रीय अध्यक्ष वंचित बहुजन आघाडी, तसेच शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांची उपस्थिती होती. सदरील कार्यक्रम हा ३तीन दिवस चालणार असून या कार्यक्रमाचा लाभ नवी मुंबईतील नागरिकांनी घ्यावा असे मराठी तितुका मेळवावा विश्र् संमेलन अध्यक्ष यांनी प्रसिद्धी प्रमुख रवि ढवळे यांना कळवले.

## आम आदमी पार्टीतर्फे मनुस्मृती जाळून संविधान वाचविण्याचा प्रण

लातूर: प्रजासत्ताक दिनानिमित्त लातूर आम आदमी पार्टीच्या वतीने शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे शुक्रवारी बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर लगेचच संविधान स्तंभा समोर मनुस्मृतीचे दहन करून संविधान प्रस्तावनेचे वाचन करण्यात आले. या कार्यक्रमावेळी बोलताना आपचे लातूर जिल्हाध्यक्ष श्री. आश्विन नलबले म्हणाले की मागील ९ वर्षांच्या मोदी सरकारच्या काळात अल्पसंख्याक आणि दलित यावर अत्याचार वाढले असून देशाला तथाकथित मनुस्मृती वर आधारित हिंदू राष्ट्र बनविण्याचा आर एस एस आणि बीजेपी यांचा डाव आहे. म्हणून आम्ही आज संविधान रक्षणाचा प्रण घेत आहोत.आम आदमी पार्टी सर्वसमभाव मानणारी पार्टी असून देशातील आमच्यासारखे बहुसंख्य हिंदू हे सहनशील आहेत. आम्ही नक्कीच बिजेपी, आरएसएसचा अजेंडा हाणून पाडू .या कार्यक्रमात जिल्हाध्यक्ष आश्विन नलबले, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख ओमकार गोटेकर, जिल्हा संयोजक आकाश मोठेराव , जिल्हा संयोजक



विश्वंभर कांबळे, महिला जिल्हाध्यक्ष अनुराधा मुनगंटी, जिल्हा उपाध्यक्ष शफीक चौधरी, जिल्हा जइउ अध्यक्ष शिवलिंग गुजर, जिल्हा ऑटो विंग अध्यक्ष रफीक शेख, शहर उपाध्यक्ष इम्रान पटेल, फिरोज शेख, नुसरत शेख, युवा जिल्हा उपाध्यक्ष आकाश कांबळे ,युवा जिल्हा सचिव विवेक वाघमारे ,आनंदा कामगुंडा, अस्लम तांबोळी, औसा तालुका अध्यक्ष दगडू माने, औसा तालुका मीडिया प्रमुख मुख्तार मनियारी, नागनाथ मोरे, रत्नदीप म्हस्के, राज मुनगंटी व ईतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# वाराणसी

काशी,बनारस,वाराणसी नावांनी परिचित असलेले भारतातील एक अत्यंत पौराणिक अशी ख्याती असलेले शहर.प्रत्येकाने एकदा तरी आयुष्यात काशीला जाऊन यावे असे सनातन धर्मात म्हंटले आहे.भारतातील अनेक राजे रजवाड्यांनी काशीत गंगातीरी स्वतःचे महाल बांधलेले दिसून येतात. माननीय पंतप्रधान नरेंद्र भाई मोदींचा खासदार या नात्याने शहराला परिस स्पर्श लाभलेला आहे.असे असूनही,अजूनही म्हणावे तितके स्वच्छ,सुंदर,नीटनेटके शहर झालेले दिसत नाही याची कारणेही अनेक आहेत. घाटांच्याकडे जाणारे रस्ते हे आजच्या युगात विचार करता, गल्ल्याच होत्या.दोन्ही बाजूचे अतिक्रमण तोडून सर्व रस्ते मोठे करण्याचा एक यशस्वी प्रयत्न केला गेलेला दिसत आहे, त्यामुळे ट्रॅफिक जाम हे आता जवळजवळ नसल्यासारखेच आहे. दशांश्वमेघ घाटावर होणारी गंगा आरती मात्र मन मोहून टाकते.आरतीचे सादरीकरण अप्रतिम असते.जवळपास एक तास चाललेली आरती ट्रीप चे पैसे वसूल करण्यात मोलाचे सहकार्य करते.

खाण्याच्या बाबतीत वाराणसी जगप्रसिद्ध आहे.तिथे असंख्य प्रकारचे चाट,समोसे, मिठाई प्रकार जागोजागी मिळतात. दुग्धजन्य पदार्थ,मलार्ईयो,रबडी सगळीकडे मोठ्या प्रमाणात मिळते.वास्तव असे आहे, शहर स्वच्छ आणि नीटनेटके ठेवले पाहिजे, ही मानसिकता शहरवासीयांच्यात आजिबात नाही.सर्व सायकल रिक्षा चालक,ऑटो चालक,टपरी वाले,ठेलेवाले,टॅक्सी चालक,आणि स्थानिक नागरिक रस्त्यावर खर्रा खावून पचापच थुंकतात.आपण त्यांचे गिऱ्हाईक आहोत,याचा कोणताच विधिनिषेध त्यांच्यात नाही. आपण जी रिक्षा ठरवली, त्यात बसायला सुरुवात करताच,रिक्षा चालक पचकन आपल्याच पायाशी चुळ भरल्याप्रमाने थुंकतो. थुंकीचे काही शिंतोडे आपल्या पायावर उडतात त्याची किळस, आपण वाटून घ्यायची नसते. काही शिंतोडे रस्त्यावरून चालणाऱ्या व्यक्तीच्या पायावर उडतात. इतके सर्व होत असताना, या विषयावरून तिथे बाचाबाची, मारामारी होताना एकही घटना घडलेली मी पाहिली नाही.रस्त्यावर चालताना लाल थुंकीवर आपण कितीही प्रयत्न केला तरी, आपला पाय पडणे चुकवू शकत नाही.थोडक्यात सार्वजनिक रस्ते ही वाराणसी वासियांची अधिकृत थुकदाणी आहे.



काशी विश्वनाथाचे दर्शन घेऊन,कॉरिडॉर मधून एक नंबर गेट पार करून, पस्तीस चाळीस पायऱ्या उतरून गंगा नदीचा ललिता घाट लागतो. वरून दिसणारे नदीचे विहंगम दृश्य मोहित करते. नदीत असंख्य लहान मोठ्या नावा फिरताना दिसतात. वाराणसीत येणारे पर्यटक या नावेतून बसून सगळे घाट फिरून येतात.नदीकिनारी उभे राहून वाहते पाणी पहा,नदीच्या दुसऱ्या घाटावर वालुका बेट आहे,एक मात्र नक्की, चुकूनही लीलिता घाटाच्या बाजूच्या घाटावर लक्ष देऊ नका. हाच तो मणिकर्णिका घाट, जिथे प्रेताची आग कधीच विझत नाही. या घाटावर दिवसाला सरासरी ऐशी ते शंभर प्रेतांचे दहन होते.

दिवसभर घाटावर प्रेत जळत असल्याने,त्याचा धूर तसेच राखेचे बारीक कण नदीकडून येणाऱ्या वाऱ्याने ललिता घाट तसेच विश्वनाथ मंदिराच्या आवारात पसरतात. यातून मंदिराचे पावित्र्य वाढते की कमी होते हे केवळ विश्वनाथच सांगू शकतील. मणिकर्णिका घाट अतिशय घाण,गलिच्छ,नरकासारखा आहे. तिथे दहन केल्याने मोक्ष मिळतो हे कदाचित यासाठी सत्य असावे की,मृतात्मा म्हणत असेल; इतक्या घाणेरड्या जागेत माझ्या शरीराचा,दहन विधी केल्याने,माझ्या शरीराची झाली तेवढी अवहेलना पुरे झाली, आता मला पुढचा जन्मच नको म्हणजेच मला मोक्ष द्या, सद्गती प्राप्त हो.

नातेवाईक प्रेताला तिरडीवर बांधून सरळ नदीपर्यंत जातात, तिथे चार खांदेकरी तिरडीसहित प्रेताला नदीच्या पाण्यात बुडवतात, ही झाली प्रेताची अंघोळ. लगेच तिरडीसहित प्रेताला तिथेच आसपास रचलेल्या लाकडाच्या सरणाजवळ आणतात. प्रथेनुसार धार्मिक विधी पूर्ण करून प्रेत सरणावर





ठेवले जाते आणि स्थानिक डोंब राजाकडून विकत घेतलेल्या अग्निने दहनविधी सुरू होतो.पंतप्रधान मोदींनी अमाप खर्च रस्ते सुशोभीकरण,घाट,सौंदर्यीकरण यावर केलेला आहे,परंतू मणिकर्णिका घाट या योजनेतून संपूर्ण वगळलेला दिसतो आहे.साधारण तीन वर्षांपूर्वी वाराणसी गांगाकिनारी नमो घाट सुरू झाला आहे जो प्रेक्षणीय आहे. लहान मुलांची खेळणी, तसेच बोटितून विहार वगैरे मनोरंजनाच्या सुविधा या घाटावर उपलब्ध आहेत.एकूणच स्थानिक लोकांची राहण्याची पद्धत, आणि मानसिकता पाहून हे शहर सुधारण्यासाठी अजून कित्तेक दशके वाट पहावी लागणार आहे हे स्पष्ट जाणवले.

--------

**विजय लिमये**

(९३२६०४०२०४) नागपूर.

# लातूर एमआयटी येथे उत्साहात प्रजासत्ताक दिन आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते ध्वजारोहण



लातूर दि.२७ – भारतीय प्रजाकसत्ताक दिनाच्या निमित्ताने माईर्स एमआयटी वैद्यकीय शैक्षणीक संकुल, लातूर येथे शुक्रवार दि. २६ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ९.१५ वाजता लातूर एमआयटीचे कार्यकारी संचालक तथा विधानपरिषदेचे सदस्य आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. याप्रसंगी पुरस्कार वितरणासह



विविध क्षेत्रात प्राविण्य मिळवल्याबद्दल विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेस आ. रमेशअप्पा कराड यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. वैद्यकीय शिक्षण प्रथम वर्षाच्या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास दरवर्षी देण्यात येणारा जनाबाई ग्यानबा शेप हा पुरस्कार यावर्षी हिंदवी बिरादार आणि स्नेहल फड यांना तर मोनिका ढाका पुरस्कार फिजा तांबोळी या विद्यार्थिनीस आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते देऊन गौरव करण्यात आला त्याचबरोबर लातूर एमआयटी वैद्यकीय महाविद्यालयातील गिरीजा नावंदीकर, प्रियंका मल्होत्रा, सिमरन माटकर, सिध्दी रुद्रावार, स्नेहल सोनकांबळे या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात प्राविण्य मिळवल्याबद्दल यथोचित सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

याप्रसंगी वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. पी. जमादार, उपअधिष्ठाता डॉ. बी. एस. नागोबा, प्रशासकीय शैक्षणिक संचालिका डॉ. सरिता मंत्री, नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य सरवनन, दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उपप्राचार्य डॉ. यतीश जोशी, मुख्य प्रशासकीय अधिकारी सचिन मुंडे, रुग्णालय अधीक्षक डॉ. माले, डॉ. अरुणकुमार राव, डॉ. विद्या कांदे, डॉ. मुकुंद भिसे, डॉ. चंद्रकला पाटील, डॉ. आशा पिचारे, डॉ. पठाण, डॉ. बस्वराज वारद, डॉ. शैला बांगड, डॉ. क्रांती केंद्रे यांच्यासह एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालय, एमआयडीएसआर दंत महाविद्यालय, फिजीओथेरपी महाविद्यालय व नर्सिंग महाविद्यालयातील विभाग प्रमुख, प्राध्यापक, डॉक्टर, विद्यार्थी, पालक व नागरीक ध्वजारोहन कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ७५व्या प्रजासत्ताक दिनी बौद्ध विहाराचे उदघाटन

नवी मुंबई / के. एच. हनवते :– ७५ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून रामजी आंबेडकर नगर सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्या वतीने झेंडावंदन करुन व सौ. विनीता बरफे (अखिल भारतीय मानव अधिकार, (एहरा) संस्था महिला सेल अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य) यांच्या सहकार्याने बौध्द विहाराचे उदघाटन करण्यात आले. त्यावेळी हिरामण (दादा) पगार सर



(संस्थापक अध्यक्ष घर हक्क संघर्ष समिती), खाजामिया पटेल (महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष रिपब्लिकन सेना), कैलाश सरकटे (खजिनदार घर हक्क संघर्ष समिती), अशोक सुर्यवंशी (महाराष्ट्र सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ), दादा भालेराव, डॅनी डिसुझा (महाराष्ट्र उपाध्यक्ष अखिल भारतीय मानव अधिकार), (एहरा संस्था) सौ. मयुरी मोरे, बौद्धाचार्य अशोक भद्रे, संतोष नरवडे, कुंडलीक कांबळे, आश्रु भालेराव, व रहिवाशी व महीला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन आणि युवा भिम सैनिक संविधान बलखंडे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

नवी मुंबई / के. एच. हनवते :– गांधीनगर (एमआयडीसी) येथे ७५ वा आमृत महोत्सव २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन आणि युवा भिम सैनिक शिक्षण, कलाक्षेत्र, चित्रकला वक्तृत्व स्पर्धेत सर्वगुणसंपन्न हर हुनरी बालक संविधान सुभाष बलखंडे याचा १२ वा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात अला त्यावेळी वंचित बहुजन अघाडी नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : दिलिप (भाई) बंदिचोडे यांनी सर्व उपस्थितांना प्रजासत्ताक दिनाच्या आणि युवा भिम सैनिक संविधान बलखंडे



यांना वाढदिवसाच्या मनभरून हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यावेळी वंचित चे कार्यकरते पदाधीकारी मोठ्या संख्येत उपस्थित होते पंचशील बुद्ध विहार अध्यक्ष – सतिश खंडाळे, सर्प मित्र – दिपक गायकवाड, गायक अशोक जमदाडे, ज्ञानेश्वर जाधव, वंचित चे युवा कार्यकर्ते – पवन मनवर, सुभाष बलखंडे, वंचित चे मा. ऊपाध्यक्ष बेलापूर तालुका – कल्याणराव एच. हनवते इत्यादी लहान थोर बालक बालिका यांनी उपस्थित राहून कार्यक्रम मोठ्या जल्लोषात साजरा केला.

## कासारशिरसी ते कोराळीवाडी -कोराळी ते कर्नाटक राज्य सरहद्द येथील ८ कोटी ७९ लक्ष किमतीच्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या रस्त्याचे उद्घाटन -खासदार ओम राजेनिंबाळकर



लातूर :– २६ जानेवारी रोजी निलंगा तालुक्यातील मौजे. कासारशिरसी येथे प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत ८ कोटी ७९ लक्ष ९५ हजार(८,७९,९५,०००/–) लक्ष निधीच्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूर रस्त्याचे उदघाटन खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

याप्रसंगी बोलताना सदर कामाचा दर्जा हा उच्च ठेवून काम करण्याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांना सुचना दिल्या. येणाऱ्या पुढील काळात या भागाचा लोकप्रतिनिधी या नात्याने ग्रामीण भागातील रस्त्यांचा दर्जा चांगला करण्याच्या दृष्टीकोनातून या विभागामार्फत जास्तीत जास्त रस्ते मंजुरीसाठी प्रयत्न राहतील असा विश्वास त्यांनी दिला.

याप्रसंगी सहसंपर्कप्रमुख श्री. संतोष सोमवंशी, जेष्ठ शिवसैनिक श्री. लिंबन महाराज रेश्मे, उपजिल्हाप्रमुख श्री. बजरंग जाधव व औसा विधानसभा तालुकाप्रमुख आबासाहेब पवार, युवासेना जिल्हाप्रमुख श्री. दिनेश जावळे, किशोर जाधव, शेखर चव्हाण, रेखाताई पुजारी, पुजाताई सगर, महादेव साळुंके, सलीम पटेल, अनिल आरेकर, ज्ञानेश्वर वाकडे, बलवंत पाटील, परमेश्वर बिराजदार व त्या भागातील सर्व गावातील ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते

# सारसोळे चौक नेरूळ न.मुं. येथे ७५ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा





नवी मुंबई / के. एच. हनवते :– सारसोळे बस डेपो चौक नेरूळ नवी मुंबई येथे सालाबाद प्रमाणे याही वर्षी २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात अला. सर्व प्रथम समाजसेवीका – वत्सलाताई खरात यांच्या शुभ हस्ते अधुनिक भारताचे संविधान निर्माते प.पु. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार तर माजी सैनिक – संजय काकडे यांच्या शुभ हस्ते आगरबत्ती दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. या वेळी वंचित बहुजन अघाडी नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : दिलिप (भाई) बंदिचोडे यांच्या शुभ हस्ते अशोक चक्रांकित राष्ट्रध्वजाला मानाची सलामी देण्यात आली. त्यावेळी (एनसीसी) स्काऊट विद्यार्थी लहान बालक बालिका यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून राष्ट्रध्वजाला मानाची सलामी दिली. राष्ट्रगीत व आम्ही भारताचे लोक या संविधान उद्देशिकेचे सामुदायिक वाचन केले. आणि या ध्वजारोहण कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा पर आपले मनोगत व्यक्त करुन समस्त भारतीय नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या या वेळी (बसपा) चे वरिष्ठ कार्यकर्ते संजय गायकवाड, राष्ट्रीय एकतादल अध्यक्ष – बाबा न्यायनीत, रिपब्लिकन सेना नवी मुंबई जिल्हाध्यक्ष – विरेंद्र लगाडे, (नमुमपा) माजी इंजीनिअर – अरविंद शिपूरकर, नेरूळ जयंती उत्सव समितीचे – धृवकांत गायकवाड, आरयदास गमरे, आनंद मेश्राम, विजय कांबळे (पोलीस अधिकारी), भारतीय बौद्ध महासभा संस्कार सचिव चंद्रकांत माने (गुरूजी), युनियन कामगार नवी मुंबई जिल्हाध्यक्ष – कोंडीबा हिंगोले उपस्थित होते, पंचशील सामाजिक संस्था सेक्टर ६ चे भिमराव तायडे यांनी संविधान गित सादर केले. युवा कार्यकर्ते रविंद्र डोंगरे, अजय रणदिवे, शामराव सावंत इत्यादी लहान थोर बालक बालीका यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यावेळी या कार्यक्रमास महीलां अधिक संख्येत उपस्थित होत्या दया झेंडे, प्रभावती हिंगोले, धनश्री हिंगोले, पद्मिनीताई रणदिवे, मंगल खरात, भारतीय बौद्ध महासभा नेरूळ शाखा – कविता कांबळे यांनी सुंदर रांगोळी काढून व गित सादर करून आपला आनंद व्यक्त केला. शेवटी या सर्व कार्यक्रमाचे अयोजक – कल्याणराव हनवते यांनी सर्व भारतीय नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या मंगलमय हार्दिक शुभेच्छा देऊन शेकडो उपस्थितांचे जाहीर अभार व्यक्त करून कार्यक्रम संपन्न केला.

# शिक्षकांनी विद्यार्थी केंद्रित शैक्षणिक कार्य करावे.सचिव मन्मथअप्पा लोखंडे



लातूर :– सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे आहे. आज विविध क्षेत्रांमध्ये स्पर्धा निर्माण झाली आहे यामध्ये विद्यार्थ्याला केंद्रबिंदू मानून शिक्षकांनी विद्यार्थी केंद्रित शैक्षणिक कार्य करावे. तेव्हाच खऱ्या अर्थाने भारत महासत्तेकडे वाटचाल करेल असे प्रतिपादन श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव सचिव मन्मथअप्पा लोखंडे यांनी बोलताना व्यक्त केले.

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, प्रा. शिवशरण हावळे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्रपणे अभिवादन करण्यात आले. त्यानंतर संगीत विभागातील प्रा. विजयकुमार धायगुडे, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. गोविंद पवार आणि चमुनी राज्य गीत आणि राष्ट्रभक्ती गीत सादर केले. यानंतर संस्थेचे सचिव मन्मथअप्पा लोखंडे यांनी ध्वजारोहण केले. पुढे बोलताना सचिव मन्मथअप्पा लोखंडे म्हणाले की, आज महाविद्यालयामध्ये आपण सर्वांच्या उपस्थितीत देशाचा गणराज्य दिन उत्साहात साजरा करीत आहोत याचा मला मनस्वी आनंद आहे. आपण सर्वांनी संविधानाला अनुसरून प्रशासकीय आणि शैक्षणिक कार्य पार पाडले पाहिजे असेही ते म्हणाले.

यावेळी डॉ. दिनेश मौने लिखित महिलाओ के खिलाफ घरेलू हिंसा की समस्या या ग्रंथाचे विमोचन सुद्धा मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मराठी विभाग, लोकप्रशासन विभाग, भौतिकशास्त्र विभाग, हिंदी विभागातर्फे विविध विषयाची भित्तिपत्रके प्रकाशित करण्यात आली.

तसेच नवनियुक्त राष्ट्रीय छात्र सेनेचे केअर टेकर डॉ. अभयकुमार धाराशिवे यांचाही सन्मान करण्यात आला. तसेच एनसीसी कॅडेटद्वारे उपस्थित मानवंदना देण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी उपस्थित सर्वांना नागरिकत्वाची प्रतिज्ञा दिली.

संस्थेचे सचिव सचिव मन्मथअप्पा लोखंडे महाविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, कार्यालय प्रमुख, शाखा समन्वयक आणि विभाग प्रमुख यांच्याशी संवाद साधला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब गोडबोले यांनी केले तर आभार उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांनी मानले.

# प्रजासत्ताक दिन निमित्त दिपगंगा भागीरथी संस्थेच्या शारदा वृद्धसेवाश्रम संकुलच्या वतीने अनाथ बेघरांना कपडे आणि मिठाई वाटप



सांगली : अमृत महोत्सवी प्रजासत्ताक दिन निमित्त दिपगंगा भागीरथी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, महाराष्ट्र राज्य संचलित, शारदा वृद्धसेवाश्रम संकुलच्या वतीने सकाळी झेंडावंदन केल्यानंतर, दिवसभरात तीन सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. दिपगंगा भागीरथी संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष तथा महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक, समाजसेवक हिंदरत्न दिपक लोंढे आणि शारदा वृद्धसेवाश्रम संकुलच्या संचालिका तथा अनाथांची माई समाजसेविका मा. शारदा लोंढे या उभयतांच्या संकल्पनेतून, ७५ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून, सांगली जिल्ह्यातील मौजे डिग्रज आणि कसबे डिग्रज येथील झोपडीत, पालावर राहणाऱ्या दीन दुबळ्यां, निराधार आणि बेघर अश्या ७५ ऊसतोड आणि वीटभट्टी कामगार कुटुंबातील महिलांना साड्या, पुरुष व लहान मुलांना कपडे, स्वेटर आणि मिठाई वाटप करण्यात आली. तसेच भगिनीं निवेदिता प्रतिष्ठान, सांगली येथील मुलींचे बालग्रह तथा बालसदन मधील निराधार, वंचित, अनाथ मुलींना शालेय गणवेश, नित्यनेमाने वापरण्यासाठी कपडे आणि मिठाई वाटप करण्यात आली. भगिनीं निवेदिता प्रतिष्ठानच्या मा. काझी मॅडम यांनी श्री./सौ. लोंढे उभयंत व मान्यवर सहकारी यांचे स्वागत केले. दिपगंगा भागीरथी संस्थेच्या उपक्रमाचे तोंड भरून कौतुक करत, उपस्थितांचे अभार मानले. या उपक्रमास अनाथांची माई मा. शारदा लोंढे, श्रीमती सुजाता जाधव, मा.योगिता खाडे आणि मा.दिगंबर कांबळे यांचेकडून अनमोल मदत मिळाली. सदर शालेय गणवेश, कपडे आणि मिठाई वाटप उपक्रमास साहित्यिक समाजसेवक हिंदरत्न दिपक लोंढे, शासकीय रुग्णालय, सांगली येथील समाजसेवा अधीक्षक मा.संजय खाडे, अभिनेता वैभव काटे आणि यश कांबळे यांचे सहकार्य लाभले. दिपगंगा भागीरथी संस्थेचे आधारस्तंभ, मार्गदर्शक सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण पुणे मा.विशाल लोंढे, उपाध्यक्ष मा.आर्यदिप लोंढे, माजी समाजसेवा अधीक्षक मा.भूषणी दीप आणि जीवन ज्योत संस्थेच्या सांगली जिल्हा अध्यक्षा मा. मिनाबेन मारू यांचे मार्गदर्शन लाभले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE